# - प्रेसनोट -

## मारामारी करुन फरारी असणारे गुंड अटक.

---

दिंनाक – २१/१२/२०१७ रोजी महादेव नगर ,कात्रज येथे राहुल कदम याचेवर चार तरुण हल्ला करुन फरार झालेबाबत भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे येथे गु.र.न.६१८/२०१७ भा.द.वि. कलम.३०७,३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले यांचे मार्गदर्शनानुसार तपास पथकातील पोउप.निरी.दत्ताजीराव मोहिते व कर्मचारी त्यांचा शोध घेत असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार व कुंदन शिंदे यांना त्यांच्या बातमिदारामार्फत बातमी मिळाली की , खुनी हल्ला करुन फरारी असणारे आरोपी हे येवलेवाडी येथे त्याच्या मित्राला भेटण्यासाठी येणार आहे. सदर बातमी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे यांना कळविली असता त्यांनी योग्य ति कारवाई करण्याचे आदेश दिले.सदर ठिकाणी पोलीस स्टाफसह रवाना झालो व बातमीच्या ठिकाणी थोडे अलीकडे जावुन थांबले. मिळालेल्या बातमीप्रमाणे तिनजण उभे असल्याचे दिसल्याने त्यास स्टाफच्या मदतीने ताब्यात घेतले त्यानी त्यांची नावे १. ऋषिकेश सिध्दार्थ नंदुरे वय १९ रा.अंजलीनगर,कात्रज,पुणे २.गोविंद हनुमंत बायगळे वय २३ रा.शेलार मळा,कात्रज,पुणे ३.अनिकेत गोकुळ केंदळे वय २० रा.महादेव नगर,पुणे अशी सांगितली.

सदर दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्यानी गुन्हा केल्याची कबुली दिली. तेव्हा त्यास भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे गु.र.न.६१८/२०१७ भा.द.वि. कलम.३०७,३२६,५०४,५०६,३४ प्रमाणे दाखल असणाऱ्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंडे , स्वारगेट विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले , पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री राजकुमार वाघचवरे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप.निरीक्षक दत्ताजीराव मोहिते,पोलीस कर्मचारी कृष्णा निढाळकर,चंदु फडतरे,अमोल पवार, प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, सर्फराज देशमुख, कुंदन शिंदे, गणेश चिंचकर,महेश मंडलीक,अभिजीत रत्नपारखी यांनी केलेली आहे.